# एकविसावे शतक व ग्रामोण कांदबरी 'तहान' च्या अनुषंगाने

**प्रा.डॉ. अनुराधा मुळे**
*श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय*
*चिखली, जि. बुलडाणा*

मागच्या काही काळात संदर्भमूल्य असलेले साहित्य निर्माण होत आहे, ही समाधानाची बाब आहे. ज्ञानधिष्ठित समाजामध्ये साहित्य निर्माण करतांना साहित्यिकांनी आपले आत्मचिंतन केले पाहिजे. त्याचप्रमाणे; एकविसाव्या शतकातील लिखानाचा विचार करतांना साहित्यिकांनी वाचकांनी वाचकांची वाचन भूक ओळखणे गरजेचे आहे.

एकविसाव्या शतकामध्ये कादंबरीच्या विश्वात मागच्या दशकात अधिक वास्तविकता डोकावू लागली आहे. नवी भौली, नवी भाषा आणि नवी धाटणी यारूपात कादंबरी लेखन वाचकांच्या भेटीला येत आहे.

प्रा. संतोष गोनवरे यांच्या मते,'लिखाणाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा धोका वाचन संस्कृती लयाला जातेय अशी ओरड होत असतांना दुसरीकडे उदंड साहित्याची निर्मिती होते आहे. मात्र, साहित्य लिखाणाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा धोका निर्माण झाला आहे.' समीक्षकांची पुरेसी संख्या नाही ही दुबळी बाजू आहे.

एकविसाव्या शतकामध्ये साहित्य लेखनावर खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचा प्रभाव दिसून येतो. जागतिकीकरण ही कल्पना अर्थशास्त्रातील असून आर्थिक–व्यापारी व्यवहारांना आंतरराष्ट्रीय स्वरूप देणारी आहे. औद्योगिक उत्पादने, शेतीमाल, गुंतवणूक, सेवा, बौध्दिक संपदा, अधिकार यांच्या खरेदी–विक्रीवरील सर्व निर्बंध काढून टाकणे या बाजारपेठेत अपेक्षित आहे जागतिकीकरणाने पैसा–नफा यांना महत्व आल्याने मानवी मुल्ये पैशात मोजावी लागतात. लोककल्याणकारी शासन शबलित होऊन जाते. प्रत्येक बाब 'नफा' म्हणून मोजता येणार नाही ? भाषा, संस्कृती, कला आणि त्यांच्याबरोबरीने जीवनमानही ऱ्हासशील होण्याची शक्यता प्रक्रियेने निश्चित केली आहे.

सभोवतालचा समग्र इतिहास, भूगोल, लोकजीवन, संस्कृती, सैांदर्यकल्पना, मूल्यभान घेत समूहजीवन, त्यातील परिवर्तने, संमिश्र स्वभावाची माणसे, सार्वकालीन जाणिवा यांना स्वतःमध्ये रिचवून टाकणारा कादंबरीसारखा साहित्यप्रकार जागतिकीकरणाच्या मूल्यव्यवस्थेला प्रतिकार करीत कल्पिते, प्रतिके, मिथके, आख्याने अशा स्वरूपात समृध्द होत जाईल. एकारलेपणा वा सपाटपणा यांना नाकारण्यासाठी विशाल जीवनाच्या अनुभूतीचे आकर्षण जागे ठेवत कल्पित आणि वास्तव यांची सांगड घालण्याचे काम कादंबरी हा साहित्यप्रकार करीत असतो.

कादंबरी हा साहित्यप्रकारात दीर्घ कथनाची परंपरा आहे. शिवाय हा साहित्यप्रकार जीवनसमांतरता प्रकट करणारा असतो. सभोवतालच्या सर्वांगीण परिस्थितीचा परिणाम कारक परिणाम लेखकाच्या संवेदनशीलता आणि जीवनसृष्टीवर दिसून येतो.कादंबरी या साहित्य प्रकारामध्ये कथनाच्या विविध पध्दती हाताळण्याची शक्यता असते. जीवनाचे बहुकेंद्रित्व, माणसाची बहुलता, परिस्थितीची संमिश्रता यांचे अस्तित्व कादंबरीत रूपित केले जात असते. वास्तववाद आणि सामाजिक दाखले यांच्यामुळे कांदबरीत कालिक संदर्भ मोठया प्रमाणावर उपलब्ध होत असतात. कांदबरी लेखनावर लेखकाची जीवनदृष्टीही प्रभाव पाडत असते. एकोणिसाव्या शतकाचा समाजाच्या आणि लेखकाच्या मानसिकतेवर आघात दिसून येतो. समाजामध्ये घडून येणारे अनेक स्थित्यंतरे याचा प्रभाव साहित्यावर दिसून येतो. साहित्यक्षेत्रामध्ये लेखक मंडळी आपल्या प्रतिभेच्या माध्यमातून ते चित्र; ते वास्तव साकारण्याचे काम करू लागली. त्यांचे संदर्भ आपल्याला कलाकृतीत पाहायला मिळतात. समाजामध्ये कोणतीही संकल्पना अस्त्विात आली की ,समाज जीवनावर त्याची प्रतिक्रिया ही उमटतच असते. मग ती कोणतीही असो.

**उद्दिष्टे** :–

1. ग्रामिण कादंबरीचे स्वरूप समजून घेणे.
2. ग्रामिण कादंबरी मागील दृष्टिकोन लक्षात घेणे.
3. त्यामधील पात्रांचा अभ्यास करणे.

**गृहितके** :–

1. ग्रामिण वातावरणाचा साहित्यावरील प्रभाव.
2. ग्रामिण लोकांच्या अडचणी.
3. तहान कादंबरीतील पाणी प्रश्न.

एकविसाव्या शतकामध्ये जागतिकिकरणाच्या स्विकारानंतर मराठी साहित्यामध्ये बराच बदल झालेला दिसून येतो. जागतिकीकरणा नंतर सर्व गोष्टींना अधिक प्रोत्साहन मिळत गेले. त्याचा परिणाम साहजिकच समाजमनावर झाला. समाजामध्ये अनेक गोष्टी घडत गेल्या. त्याचे प्रकटीकरण त्या त्या कालखंडातील लेखक मंडळीनी आपल्या कलाकृतीतून मांडण्याचा प्रयत्न केला.

ग्रामिण साहित्य प्रवाह आणि ग्रामिण जीवनशैलीशी निगडीत 'तहान' कादंबरी आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून साठी उलटली तरी आपली खेडी अनेक प्रश्नांनी ग्रासलेली आहेतच. पाणी प्रश्न हा भिषण बनत चालला आहे. पाणी टंचाईच्या दिवसात विविध पातळीवरील आपली तहान भागवण्यासाठी अनेक प्रकारची यंत्रणा राबते. त्या बरोबरच अनेक वृत्ती प्रवृत्ती जन्माला येतात.सदानंद देशमुख यांनी आपल्या 'तहान' या कादंबरीच्या माध्यमातून पाणी टंचाईवर प्रकाश टाकला आहे. पाणी टंचाईच्या भयानकतेवर केवळ माणसेच होरपळली जात नाहीतर जनावरेही बळी जातात. शिवार, भोते, प्राणि, पक्षी, हया साऱ्यांना आपले जीवन मुठीत घेवून जगावे लागते. त्याचबरोबर मूल्यहीन समाजव्यवस्थेत आपली जीवनमुल्ये जोपासणारांना अटळ करावा लागतो आहे. हे सिध्द होते. त्याचबरोबर भौतिक सुखाभोवती घिरटया घालणाऱ्या वृत्तीचेही दर्शन घडते. जीवनच सारे तणावग्रस्त बनते. केवळ राधोजी शेवाळेच

याला अपवाद ठरत नाही तर सामाजिक वास्तवताही त्याला मूल्यहीनतेकडे घेवून जाते. सदानंद देशमुख यांची 'तहान' ही कादंबरी जरी ग्रामिण जरी ग्रामिण दुष्काळी परिस्थितीचे दर्शन देत असली तरी त्यातील वातावरण आणि पार्श्वभूमी ही जागतिकीकरणाच्या दाहकतेचा स्पर्श आहे. जाागतिकीकरणाला स्विकारणे समाजातील ढासळलेली मूल्यव्यवस्था, जपण्याबद्दल स्वार्थी वृत्ती याचे दर्शन घडते. बबन शेवाळे सारखा जेव्हा पाण्याचा पैसा कमावतो आणि आपल्या आई जवळ देतो. त्याने पॅन्टच्या खिशात हात घातला. मूठभर नोटा बाहेर काढल्या. दोनच्या, दहाच्या, पाचच्या. वीसच्या, तांबडया, हिरव्या, निळसर नोटा पोराच्या हातातल्या नोटा घेण्यासाठी मायने नेसला लुगडयाची पदराची झोळी पसरली. त्याने गाडीवर बसूनच सगळे खिसे तिच खाली केले, तर तिच्या अंगाला मोराचे पिसारे फुटल्यासारखे झाले. पाण्याची धार दारात यावी तशी पैशाची धार दारात येत व्हती'. आता लय पैसा साठवायचा.'(पृ.6) ही आईची आशा ही भौतिक सुखाकडे घेवून जाणारी आशा आहे. जागतिकीकरणाच्या रेटयात आपली सुखे, आपल्या आकांक्षा पूर्ण करणे सामान्यांच्या पदरी नसते. अशा वेळी कुठणतरी पैसा आला की, अनेक गोष्टींची हौस निर्माण होते. त्याचबरोबर राजकीय परिस्थितीचाही संदर्भ देताना भोगवादी, स्वार्थी संस्कृतीचे दर्शन घडते. ते पुढीलप्रमाणे,' आरे आपल्याला कोणता राजकीय पक्ष तिकीट देणार हाय? आजकाल पैसा पाहून तिकीट देतात. कावून की पुढे चालून निवडणूक लढवायसाठी पैसा पाहयजे. मत देणारे आता बिन पैंशाच मत देत नाईत.'(पृ.17) नंदू आळशी ही भावना व्यक्त करतो ती खरोखर सत्य आहे. आधुनिक काळात राजकारणाचा लोकशाहीच्या स्थित्यंतराचा अनुभव येतो. पैसा, संस्कृती जन्म घ्यायला लागते. माणसे पाण्याचा, मताचा, सत्तेचा पैशाचा वापर करतात ही समाजाची वास्तवता आहे. सदानंद देशमुख यांनी वाढत्या नागरीकरणाचाही संदर्भ देण्याचे विसरलेले नाहित. 'माती खावावं लागलं माती..... कावून की आता जिकडी पहावं तिकडी माणसंच दिसतात किडया आळयावाणी कोणतंबी गाव पहा कसं चारी अंगानं वाढाय लागलं माणसं बिजवाई पेरायच्या वावरात घरं बांधू ऱ्हायले हाळू हाळू बिजवाई पेरायले वावर उरणार नाईं. जिकडं पहावं तिकडं घरंच घरं दिसतीन. मग माणसायले खायले मातीबी सापडणार नाई.(पृ.92)हे खरेच आहे वाढते नागरीकरण माणसाला धोकादायक आहे. पिकणारी जमीन आणि वाढणारी प्रजा यांचा कुठेच मेळ बसत नाही. संबंध कादंबरीत प्रश्न पाण्याचा असला तरी तो माणसांच्या जीवनाशी निगडीत आहे. माणसाची व्याप्ती आणि जीवनाची सत्यस्थिती यांचा समतोल साधला आहे ही कादंबरी भ्रष्टाचाराचे कथन सुध्दा या ठिकाणी पहायला मिळते. 'आरे निरानाम फुकाया पैसा कमावतात नव्हे... पोलिसवाले हाप्ते खातात, पी. एच. सी. वाले डॉक्टर, कंपाउन्डर सरकरी औषधी खाजगी प्रॅक्टीस करताना वापरतात. तलाठी, क्लर्क शेतकऱ्याला लुबाडतात....मास्तर टयुशन घेतात....बॅकवाले कास्तकारायले कर्ज देताना खुडणं घेतात. कोंबडयाच्या पार्टा मागतात किती म्हणून सांगू.... अशी एकतरी नवकरी आहे का तिच्यात कमीशन नाही? आता पाणी पुरवठयाला बी आर्धा निधी हाडप करून आपली जिंदगी वलिती करून घेतात. सम्दी साली नोकरशाही मनमानी अन गोर गरीब जनतेची तानातानी.... ..(पृ 96) भ्रष्टाचाराची प्रवृत्ती समाजाच्या सर्व थरात पाय रोवून बसली आहे. सांगा कसे जगायचे ?असा सवाल सामान्य माणसाच्या पुढे उभा आहे. विकासाच्या नावाने सरकार, आणि त्यांची यंत्रणा वर पासून खाल पर्यंत कार्यरत असते. मात्र वास्तव परिस्थिती वेगळीच असते. समाजाच्या हया विकृत प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्यास लेखक विसरलेला नाही.

'तहान' या कादंबरीचे सर्वात मोठे वेगळेपण म्हणजे कादंबरी मध्ये असणारे वातावरण हे पाणी प्रश्नावर जरी असले तरी जागतिकीकरणाच्या दाहकतेचा समाजमनावर होणारा परिणाम या कादंबरीमध्ये लेखकाने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. जागतिकीकरणाच्या स्विकाराने समाजामध्ये अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. भ्रष्टाचार, वाढते नागरीकरण, भौतिक सुखलोलुपता हव्यास, भयग्रस्तता, हुकुमशाही, स्वार्थीवृत्ती, राजकारणातील बोकाळलेला स्वैराचार इ. अनेक गोष्टींचे संदर्भ ही कादंबरी आपणास देते. एकूणच जागतिकीकरणाच्या स्वीकाराची परिणिती समाजवास्तवावर कशी होते आणि त्यामधून सामाजिक स्थित्यंतरे प्रखर होतात, याचे दर्शन कादंबरी घडविते. एकंदर जागतिकीकरणाच्या सर्वदूर प्रभावामुळे समकालीन, राजकीय, वास्तवाला प्राप्त होत जाणारा विद्रूप चेहरा ठळकपणे लक्षात आणून देण्यात 'तहान' ही काद्रंबरी यशस्वी ठरली आहे.

**निष्कर्ष :–**

1. एकविसाव्या शतकातील ग्रामिण कादंबरीमध्ये जागतिकीकरणाचे वास्तव दिसून येते.
2. अनेक कादंबऱ्यामध्ये ही सत्यता दिसून येते.'तहान' कादंबरी याला अपवाद नाही.
3. अनेक गावामध्ये पाणी समस्या हा मोठा प्रश्न आहे. सदानंद देशमुखानी खुप चांगल्या प्रकारे हाताळला आहे. जागतिकीकरणाच्या दाहकतेची वास्ववता त्यामध्ये दिसून येते.
4. राघोजी शेवाळेची ही कथा एकमेव नसून ती जागतिकीकरणात होरपळलेल्या समस्त सामान्य पुरूषाची कथा आहे.

**संदर्भ :–**

1. *जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभावः प्रा. डॉ. वासुदेव वले*
2. *जागतिकीकरण आणि मराठी साहित्य : डॉ. शरद गायकवाड, प्रा. सुनील शिंदे*
3. *जागतिकीकरण मराठी कादंबरीः विश्राम गुप्ते*
4. *तहानः सदानंद देशमुख*